# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

सूचना का अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००६२१

**अपिलार्थी श्री. राजेंद्रकुमार किशनलाल जायस्वाल**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक राज्यकर आयुक्त (नोडल-१२)**
सहाय्यक राज्यकर आयुक्त (नोडल विभाग-१२), मुंबई यांचे कार्यालय,
एफ-विंग, १ ला मजला, नवीन इमारत, वस्तु व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई -४०० ०१०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा राज्यकर उप आयुक्त (ई-१०१)**
सहाय्यक राज्यकर आयुक्त (नोडल विभाग-१२), मुंबई यांचे कार्यालय,
तळमजला, नवीन इमारत, वस्तु व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई -४०० ०१०.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १२.११.२०२१ | १०.१२.२०२१ | १४.१२.२०२१ | २०.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०७.०२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १०.१२.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २०.०१.२०२२ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दि. १२.११.२०२१ अन्वये आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व परवाना धारकांची यादी व सी.एल.-१, सी.एल.-२, सी.एल.-३, एफ.एल.-१, एफ.एल.-२, एफ.एल.-३, परमिट रुम आणि बिअर शॉपी परवाना धारकांची व्हॅट (सी.एस.टी) आणि जी.एस.टी नंबर घेतले असल्यास त्यांची संपूर्ण यादी व न घेणाऱ्यांची यादी देण्यात यावी, अशी माहिती विचारलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १०.१२.२०२१ अन्वये अपिलार्थी यांना आपण मागणी केलेली माहिती मागणी केलेल्या स्वरुपामध्ये उपलब्ध नाही. वस्तू व सेवाकर विभागामध्ये सर्व धारिण्या वेगवेगळ्या नोडल अधिकारी यांच्याकडे नियंत्रण व कार्यवाहीकरिता असतात नेमक्या कोणत्या व्यापाऱ्यांची माहिती हवी आहे हे मुद्देसूदपणे या कार्यालयांस अवगत केल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मागवून त्याप्रमाणे निर्णय घेता येईल तसेच आपण व्यापक व विस्तारीत प्रमाणात माहिती मागितलेली आहे. त्यामुळे माहिती देता येणार नाही, असे कळविले आहे.

अपिलार्थी यांनी दि. १४.१२.२०२१ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०१.२०२२ रोजी अपील अर्ज अंशतः मान्य करण्यात आला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्याने मागितलेल्या माहितीचे शुल्क परिगणना करुन सदर माहिती १० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी,असे आदेश पारीत केले आहेत.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थींनी माहिती मागितली होती तेंव्हा खूप व्यापक प्रमाणात आहे त्यामुळे देता येणार नाही असे कळविले होते. तथापि, प्रथम अपिलामध्ये माहिती देण्याचे आदेश दिल्यामुळे त्यानंतर नोडल विभाग-१२ या कार्यालयांतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी खालील टप्प्यानुसार अपिलार्थींच्या माहिती अर्जावर कार्यवाही करण्यात आलेली आहे असे सादर केले आहे:

दिनांक १६.११.२०२१ रोजी अपिलार्थींचा माहिती अर्ज प्राप्त झाला. दिनांक १०.१२.२०२१ रोजी माहिती व्यापक व विस्तारीत प्रमाणात असल्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत आहे, त्यामुळे माहिती देता येणार नाही असे अर्जदारास कळविले. अपिलार्थी यांनी दिनांक २१.१२.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे प्रथम अपील दाखल केले. दिनांक २१.०१.२०२२ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा राज्यकर उपायुक्त (ई-१०१), नोडल-१२ यांनी अर्जदारास त्याने मागविलेल्या माहितीचे शुल्क परिगणना करुन माहिती देण्याचे आदेश दिले. दि. २१.०१.२०२२ रोजी अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीचे शुल्क रु. १९२/-भरण्याकरिता अर्जदारास कळविण्यात आले. दि. ०२.०२.२०२२ रोजी अर्जदाराने रु.१९२/- चा भरणा केला. दि. ०२.०२.२०२२ रोजी मागितलेली माहिती नोडल विभाग-१२ या कार्यालयांतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेऊन अर्जदारास स्पीडपोस्टद्वारे पुरविण्यात आली. दि. ०३.०२.२०२२ अर्जदारास स्पीड पोस्टद्वारे माहिती पाठविल्याबाबत ईमेलद्वारे अवगत करण्यात आले.

अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी दिनांक १९.४.२०२४ रोजी आयोगास त्यांचे लेखी निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी आजपर्यंत माहिती दिली नाही, असे नमूद केले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या निवेदनानुसार दि. ०२.०२.२०२२ रोजी अर्जदाराने मागितलेली माहिती स्पीडपोस्टाद्वारे त्यांना पाठविण्यात आली आहे व तसे अपिलार्थींना ई-मेल द्वारेही अवगत करण्यात आले आहे. सबब,आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. अपिलार्थींना माहिती देण्यात आली आहे तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक ०२.०२.२०२२ रोजी पाठविण्यात आलेली माहिती पुन्हा अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
२४-४-२०२४

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २४.०४.२०२४**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai